ZPAHM-14014(11)/15/2025-W NORTH

1/2611137/2026

**अशोक अंबादास पंडीत, वरिष्ठ सहा.(लेखा)**
**यांचे गैरव्यवहार/गैरवर्तणूकीबाबत त्यांचेविरुध्द**
**शिस्तभंगविषयक कारवाई करणेबाबत...**

**अहिल्यानगर जिल्हा परिषद**
**अर्थ विभाग**
**क्र. अर्थ/कार्या-१/आस्था-१/३९४/२०२६**
**अहिल्यानगर दिनांक- १३ /०८/२०२६**

**वाचा:-** १) या कार्यालयाचे ज्ञापन/दोषारोप पत्र जा.क्रं.अर्थ /कार्या-१/आस्था-१/ २२९/२०२५ दिनांक ०५/०७/२०२५

२) गटविकास अधिकारी,पं.स.शेवगाव यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/आस्था-१/४५६/२०२५ दिनांक १५/०७/२०२५

३) गटविकास अधिकारी,पं.स.शेवगाव यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/आस्था-१/५४८/२०२५ दिनांक ०४/०८/२०२५

४) या कार्यालयाचा आदेश क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/३९८/२०२५ दिनांक १९/०९/२०२५

५) सहाय्यक आयुक्त (चौकशी),नाशिक विभाग नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र. विशा.४/खाचौ/सी.आर.१०९/२०२५ दि. ०७/०७/२०२६

६) महा.जि.प.जि.से.(शिस्त व अपील) नियम १९६४ चे भाग ३ नियम ४

७) इकडील अं.का.नोटीस जा.क्र.अर्थ/कार्या१/आस्था१/२७७/२०२६ दि.२२/०७/२०२६

८)श्री.ए.ए.पंडीत,यांचेकडील खुलासा दिनांक ०३/०८/२०२६

श्री.अशोक अंबादास पंडीत हे वरिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदावर आरोग्य विभाग,जि.प.अहिल्यानगर येथे कार्यरत असतांना त्यांनी जि.प.सा.बां.उत्तर विभाग,अहिल्यानगर येथे लेखाविषयक कामकाजामध्ये शासकीय कपातीच्या रकमेत केलेल्या गैरव्यवहार व अपहार प्रकरणी तसेच अन्य गैरवर्तणूकीप्रकरणी संदर्भ क्रमांक १ अन्वये त्यांचेविरुध्द दोषारोप निश्चित करण्यात आलेले होते. व संदर्भ क्रमांक २ अन्वये सदरचे दोषारोप श्री.पंडीत यांना बजावलेबाबत दिनांकीत स्वाक्षरीची पोहोच इकडेस प्राप्त आहे.

संदर्भ क्रं.३ अन्वये कळविण्यात आलेप्रमाणे श्री.पंडीत यांनी विहीत मुदतीत कोणत्याही प्रकारचे बचावाचे निवेदन सादर केलेले नाही. तथापी दोषारोपाचे गंभीर स्वरुप व श्री.पंडीत यांनी त्यांचेवरील आरोपाबाबत कोणत्याही प्रकारचे बचावाचे निवेदन सादर केलेले नसल्यामुळे त्यांचे न्याय हक्काचे दृष्टीने संदर्भ क्रं.४ अन्वये कार्यालयाने त्यांचेविरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांच्या संदर्भात विभागीय चौकशी करणेकामी विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी) आयुक्त कार्यालय, नाशिक यांची नेमणुक केलेली होती.

त्याप्रमाणे चौकशीचे कामकाज पुर्ण करुन सहाय्यक आयुक्त (चौकशी),नाशिक विभाग नाशिक संदर्भ क्रं.५ अन्वये चौकशी अहवाल प्राप्त झालेला असुन त्यांनी दोषारोपाप्रमाणे निष्कर्ष खालीलप्रमाणे दिलेले आहेत.

| आरोप क्र. | दोषारोपाचे विवरण | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | कार्यभार हस्तांतरण न करणे/विलंबाने कार्यभार हस्तांतरण करणे/संपुर्ण कार्यभार हस्तांतरण न करणे | आरोप सिध्द होतो |
| २ | शासकीय दस्तऐवज अनाधिकृतरित्या स्वतःजवळ बाळगणे | आरोप सिध्द होतो |
| ३ | कार्यालयात अनाधिकृतरित्या स्वतःचे संगणक व संगणक साहित्य गैरकामकाजासाठी वापरणे | आरोप सिध्द होतो |
| ४ | आयकर,जीएसटी,विमा,कामगार कल्याण निधी,सुरक्षा अनामत,दंड इ.कारणासाठी देयकामधून कपात केलेल्या रक्कमा स्वतःच्या पॅन क्रमांक APTPP5401Q वर भरणा करणे | आरोप सिध्द होतो |
| ५ | शासकीय रक्कमेच्या कपातीचे धनाकर्ष ( Demand Draft) ची रक्कम रुपये ४४,२८,१११/- स्वतःच्या खात्यामध्ये जमा करणे | आरोप सिध्द होतो |
| ६ | शासकीय रकमेच्या न वटलेल्या कपातीचे धनाकर्ष ( Demand Draft) ची रक्कम रुपये ३६,६५,५८०/- स्वतः जवळ ठेऊन घेतलेबाबत. | आरोप सिध्द होतो |
| ७ | जिल्हा परिषद अहिल्यानगर ची प्रतिमा मलीन केलेबाबत. | आरोप सिध्द होतो |
| ८ | खोटे दस्तऐवज तयार करुन,खोटया स्वाक्ष-या करुन स्वतःच्या खात्यावर रक्कम वर्ग केलेबाबत. | आरोप सिध्द होतो |

वरिलप्रमाणे श्री.पंडीत यांचेवरील गंभीर असलेले दोषारोप व त्यावरील प्राप्त निष्कर्षास अनुसरुन कार्यालयाने इकडील संदर्भ क्रं.७ अन्वये श्री.ए.ए.पंडीत,वरिष्ठ सहा.(लेखा) यांनी यांना म.जि.प.जि.से.(शिस्त व अपील) नियम १९६४ चे भाग तीन नियम ४ (सात) नुसार **सेवेतून बडतर्फ करणे-अशी बडतर्फी सामान्यतःभावी नोकरीसाठी अपात्रता ठरेल** ही शिक्षा प्रस्तावित करुन अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावणेत आलेली होती.त्याप्रमाणे संदर्भ क्रं.८ अन्वये श्री.पंडीत यांचा खुलासा प्राप्त झालेला आहे.

श्री.पंडीत यांनी त्यांचे खुलाशामध्ये नमुद केलेप्रमाणे ते प्रथम रुजू परिचर या पदावरुन पदोन्रतीने वरिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदावर पदोन्नत झालेले असून त्यांना लेखा शाखेचे कामकाजाचा अनुभव नाही.तसेच त्यांचे लेखाविषयक प्रशिक्षण झालेले नसून ऑनलाईन कामकाजाचेही प्रशिक्षण मिळालेले नाही. श्री.पंडीत यांनी विदीत केलेप्रमाणे त्यांनी केलेल्या गैरव्यवहार/गैरवर्तणामुळे झालेल्या शासनाच्या नुकसानापोटी त्यांनी वेळोवळी रक्कम रु.१४,४९,०००/- (चौदा लक्ष एकोणपन्नास हजार मात्र) भरलेले आहेत.तसेच अनियमिततेने शासकीय खजिन्यातून काढण्यात आलेल्या सर्व रकमा शासनास भरण्यास तयार आहे असे नमूद केलेले आहे.त्यांचे निवेदनानुसार त्यांचा मुलगा,पत्नी व वृध्द आई वडील यांचे पालन पोषणाची पुर्णतः जबाबदारी त्यांची असून त्यांना उदरनिर्वाहाचे अन्य कोणतेही साधन नाही.त्यामुळे त्यांना प्रस्तावित केलेप्रमाणे बडतर्फीची शिक्षा न देता सौम्य प्रकारची शिक्षा करावी अशी विनंती केलेली आहे.

तथापि श्री.पंडीत यांचेविरुध्द शासकीय रकमांचे अपहार करणे व त्यासारख्या गंभीर दोषारोपाचे स्वरुप तसेच प्राप्त चौकशी अहवालातील सर्व आठही आरोप सिध्द झालेचे निष्कर्षानुसार तसेच प्राप्त अहवालातील श्री.पंडीत यांनी यापुर्वी केलेल्या शासकीय रकमेच्या अपहाराचा उल्लेख करुन श्री.पंडीत हे अपहार करण्यामध्ये सराईत असल्याचे दिसून येत असल्याचे नमूद केलेले आहे. त्याप्रमाणे श्री.पंडीत यांनी त्यांचे बचावाचे निवेदनात सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे.

सबब श्री.अशोक अंबादास पंडीत यांचेविरुध्द सिध्द झालेल्या उक्त नमुद दोषारोपातील गैरवर्तनामुळे त्यांचेकडून महाराष्ट्र जिल्हा परिषद.जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ (३) चे उल्लंघन केल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे श्री.ए.ए.पंडीत,वरिष्ठ सहाय्यक (लेखा) हे खात्यामार्फत होणा-या शिस्तभंग विषयक कार्यवाहीस पात्र ठरतात. सबब महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे भाग तीन नियम चार (सात) नुसार आपणाविरुध्द या आदेशाच्या दिनांकापासून सेवेतून बडतर्फ करणे - अशी बडतर्फी सामान्यतः भावी नोकरीसाठी अपात्रता ठरेल. ही शिक्षा या आदेशान्वये अंतिम करण्यात येत आहे.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असुन त्याचा संकेतांक क्र. 2026081305027 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 13-08-2026 18:51:56

**आनंद भंडारी** (भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, अहिल्यानगर**

प्रति,

श्री.अशोक अंबादास पंडीत,सेवानिलंबित वरिष्ठ सहाय्यक (लेखा)
आरोग्य विभाग,जि.प.अहिल्यानगर

प्रत-जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.अहिल्यानगर

२/- सदर आदेशाची नोंद श्री.पंडीत यांचे मुळ सेवापुस्तकात घेऊन त्याची प्रमाणित केलेली छायांकीत प्रत इकडेस सादर करण्यात यावी.

प्रत : गटविकास अधिकारी,पंचायत समिती शेवगाव

२/- सोबतचा आदेश श्री.ए.ए.पंडीत,सेवानिलंबित वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांना बजावणेत येऊन त्याप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेत यावी.

**स्वाक्षांकित /XXX**

**आनंद भंडारी** (भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, अहिल्यानगर**